आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI NO. MAHBIL/2011/39044

वर्ष १४ | अंक ७ | ऑक्टोबर २०२५ | मूल्य ₹५/-

Grahak Tituka Melwawa

# ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत

ग्राहक हिताय ग्राहक सुखाय

मुंबई ग्राहक पंचायत MGP 50 सुवर्ण महोत्सवी वर्ष २०२४-२०२५

MEMBER OF CONSUMERS INTERNATIONAL

जागो ग्राहक जागो

## दिवाळी येणार आनंद होणार, घरोघरी तुमच्या घरी अन् आमुच्या घरी !



# नवदुर्गा २०२५

## मुंबई ग्राहक पंचायतीच्या कार्यात धडाडीने कार्य करणाऱ्या नवदुर्गा



अलका मोकाशी



अनघा रेगे



उल्का पाटील




तृप्ती म्हात्रे



पूजा जोशी-देशपांडे



मृणाल बेडेकर



जान्हवी नाडकर्णी



नेहा जोशी



अर्चना पानगांवकर

## मुंबई ग्राहक पंचायतीला या नवदुर्गांचा सार्थ अभिमान आहे

मुंबई ग्राहक पंचायतीच्या अंधेरीतील ग्राहक पंचायत पेठेत एकीकडे वंचितांमधील उद्यमशीलतेला प्रोत्साहन देणारी 'सेतू बांधा रे' ही पेठ दिमाखात भरलेली असताना त्याच हॉलच्या सभागृहात ग्राहक पंचायतीचे काम व्यापक करण्यात 'सेतू' ठरणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान व्हावा, हा एकत्र योग येण्याचे हे तिसरे वर्ष. यंदा शनिवार, २७ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता नवदुर्गा पुरस्कार योजला आहे.सर्व स्वयंसेवी कार्यकर्ते मिळून आपली संस्था चालवतात. विना मोबदला. त्यातही महिलांचे प्राबल्य आहे. आपले घर, करियर, व्यवधाने सांभाळून नेमाने, नेटाने संस्थेचे काम जोरकसपणे करणाऱ्या, भरीव योगदान देणाऱ्या नऊ महिला कार्यकर्त्यांना नवरात्रीत पुरस्कार देण्याची प्रथा आपले कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे यांनी २०२३ पासून सुरू केली आहे. यंदा निवडल्या गेलेल्या नवदुर्गांचे हार्दिक अभिनंदन. त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा.

RNI No. MAHBIL/2011/39044

**मुंबई ग्राहक पंचायत**

**विश्वस्त मंडळ**
डॉ. बाळ फोंडके
अनुराधा गोरे
ललिता कुलकर्णी
अनुराधा नरसाळे
संजीव मंत्री

**अध्यक्ष**
डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**
अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**
ॲड. शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, स्वीकृत)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह, स्वीकृत)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**कार्यकारिणी सभासद**
ज्योती मोडक
शीला देवळेकर
राजेंद्र राणे
शुभदा चौकर
अनघा आचरेकर
मंगला गाडगीळ
शर्मिला रानडे
आलोक हर्डीकर
विवेक केळकर
प्रकाश पाटील
उदय पिंगळे (स्वीकृत)
नेहा जोशी
कल्पिता रानडे
विनायक सोमण (स्वीकृत)
सुधीर तावरे

**निमंत्रित**
संघटन विभाग प्रमुख

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक/संघटना सहमत असतीलच असे नाही.

# ग्राहक तितुका मेळवावा

ऑक्टोबर २०२५ | आश्विन - कार्तिक १९४७

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ०४
GST कपातीचे स्वागत पण अमलात येण्याचे आव्हान

**दिव्या दिव्या रे दीपत्कार!** ०५

**‘ग्राहक भवन’चा जुहू येथील भूखंड बिल्डरला आंदण देण्याचा महापालिका अधिकाऱ्यांचा डाव फसला** ०८

**नागालँडमधील कॉफी बोर्डाच्या बैठकीचा अविस्मरणीय अनुभव** १०

**पर्यावरणप्रिय गणेशोत्सव- बहुढंगी अभियान** १२

**पुणे वितरणतर्फे पाककला स्पर्धा** १३

**शाडू मातीचे गणपती करण्याची कार्यशाळा** १४

**बोरिवलीत इको फ्रेंडली गणेशोत्सव** १५

**दिवाळीतील खरेदी** १६

**गणपती कार्यशाळा** १७

**‘बँकिंग’बद्दल बोलूया** १८
कर्जाचे सापळे - फसू नका

**‘Be a Safe Rider’** १९

**४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा** २०

**Proposed Amendments to MGP Memorandum of Association & Bye-laws** २१

**Dark Patterns and Consumer Protection** २२

**Digital Frauds – a huge Challenge** २२

**सहज, सोप्या पध्दतीचा आकाशकंदील** २३

**आनंदोत्सव पंचायत पेठेचा** २४

**संपादक** शुभदा चौकर
**संपादकीय साहाय्य** नेहा जोशी
**सल्लागार** ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
**मुखपृष्ठ** राजेंद्र राणे
**अक्षरजुळणी व कला दिग्दर्शन** रिद्धी नि. पाटील, तन्वी गोखले
**मुद्रण** इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

Printed & Published by **SHUBHADA CHAUKAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat**, Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai – 400 056. Ph.: 022-4750 8541/42 (Office).
• Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in
• Website : **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

संपादकीय

# GST कपातीचे स्वागत पण अमलात येण्याचे आव्हान

केंद्र सरकारतर्फे अनेक वस्तूंवरील जीएसटीचे दर कमी करण्यात आले आहेत. जीएसटीचे सध्याचे चार स्लॅब (5%, 12%, 18%, 28%) रद्द करून, आता केवळ दोनच स्लॅब ठेवण्यात आले आहेत, 5% आणि 18%. अन्नपदार्थ, कापड, कार, एसी, टीव्ही यांसारख्या रोजच्या वापरातील आणि महत्त्वाच्या वस्तूंवरील जीएसटी दरात कपात करण्यात आली आहे. काही वस्तू आणि सेवा 'शून्य जीएसटी' अंतर्गत आणल्या आहेत. यामध्ये जीवनरक्षक औषधे आणि आरोग्य विम्यावरील कर काढून टाकण्यात आला आहे. हे नवीन दर २२ सप्टेंबर २०२५ पासून देशभरात लागू होणार, असे शासनाने म्हटले आहे. पॅकबंद वस्तूंच्या उत्पादकांचा माल आधीपासून विक्रेत्यांकडे आहे. त्याची लेबले बदलायची का, नवीन स्टिकर लावून वस्तू विकायच्या का, उत्पादक आणि विक्रेत्यांना नेमक्या काय, कशा सूचना द्यायच्या, यासाठी मध्यंतरी केंद्र सरकारच्या ग्राहक मंत्रालयातर्फे एक सभा बोलवण्यात आली होती. त्या आभासी सभेत आपल्या संस्थेतर्फे अनुराधा देशपांडे, अनिता खानोलकर, शुभदा चौकर व कल्पिता रानडे सहभागी झाल्या होत्या. या प्रतिनिधींनी काही सूचना केल्या. जुनी लेबले न झाकता त्याखाली नवीन सुधारीत किमतीचे लेबल/स्टँप असावा. किती टक्क्यांनी MRP कमी झाली, हेही त्या लेबलवर नमूद केलेले असेल तर ग्राहकांना नेमकेपणाने कळेल की, बरोबर फायदा मिळतोय की नाही, ते. काही पॅकबंद खाद्य उत्पादनांवर (बिस्किटे, चॉकलेट बार) अनेकदा MRP पटकन दिसणार नाही, अशा तऱ्हेने ती पाकिटाच्या फोल्डवर प्रिंट केलेली असते. त्याबद्दलही ग्राहक मंत्रालयाने स्पष्ट सूचना द्याव्या, असेही संस्थेच्या प्रतिनिधींनी सुचवले.

दरम्यान, केंद्र सरकारने १८ सप्टेंबर रोजी सुधारीत MRP बाबत उद्योगांना काही अवाजवी सवलती दिल्या. त्या मागे घ्या, अशी मागणी मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे आपण केंद्रीय मंत्र्यांकडे केली आहे. केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री श्री. प्रल्हाद जोशी यांना पत्र पाठवून केंद्रीय ग्राहक व्यवहार विभागाने जारी केलेल्या परिपत्रकातील अनाठायी आणि असमर्थनीय सवलती तात्काळ मागे घेण्याची मागणी केली. या परिपत्रकात जीएसटी दर कपातीनंतरही उत्पादक व विक्रेत्यांना जुन्या एमआरपीसह वस्तू विकण्याची आधी ३१ डिसेंबरपर्यंत दिलेली मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवून देण्यात आली, जी ग्राहक हिताविरुध्द आहे.  काही ठिकाणी याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या त्याही ग्राहकांच्या मनात गोंधळ निर्माण करणाऱ्या होत्या. तसेच नवी सुधारीत कमी झालेली किंमत दर्शवणारा स्टिकर लावण्याची अटही या परिपत्रकातून काढून टाकण्यात आली. उद्योगांना देऊ केलेल्या या सवलतीमुळे काही गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. ग्राहकांना जीएसटी कपातीनंतरही जास्त किंमत मोजावी लागेल. विक्रेते व उत्पादक ग्राहकांना लाभ न देता जुन्या किंमती कायम ठेवू शकतात आणि नफेखोरी करू शकतात. बाजारात ३१ मार्चपर्यंत MRP बाबत गोंधळाचे वातावरण राहू शकेल.



आपल्या पत्रात नमूद केले आहे की, पहिल्या परिपत्रकात एमआरपी सुधारणांबाबत ग्राहकांच्या माहितीसाठी सार्वजनिक जाहिरात अनिवार्य करण्यात आली होती, जी ग्राहकांच्या हितासाठी योग्य होती. मात्र, नवीन परिपत्रकात या सर्व अटी शिथिल करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे ग्राहकांची फसवणूक होण्याचा धोका वाढतो. ग्राहकांचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी आणि जीएसटी कपातीचा लाभ थेट ग्राहकांपर्यंत पोहोचावा, यासाठी शिरीष देशपांडे स्वत: आपल्या संस्थेतर्फे जागल्याची भूमिका निभावत आहेत.

GST कपातीचा संपूर्ण फायदा ग्राहकांपर्यंत पोचतोय की नाही, हे बघण्याची जबाबदारी ग्राहक संस्था म्हणून आपण घेत आहोत, तशी ती आपल्यातील प्रत्येक ग्राहकाचीही आहे. आपण सर्व सजग ग्राहकांनी याकडे लक्ष देऊन असावे. विशेषत: पॅकबंद खाद्यप्रकार, स्वच्छके, औषधे, भांडी, कपडे, स्टेशनरी, वाहने अशा वस्तू, जीवनविमा व आरोग्यविमा यांसारख्या सेवा घेताना आपल्याला त्या स्वस्त मिळताहेत की नाही, जितके टक्के GST कपात झाली आहे, तितक्या प्रमाणात फायदा होतोय की नाही, हे बघणे आवश्यक आहे. त्याबद्दल सर्व ग्राहकांना माहिती देणेही आपल्या हातात आहे.

कोणतेही कायदे, नियम प्रभावी केव्हा होतात, आपण जागरूकपणे वापरू तेव्हा! ग्राहकांच्या हातातील ही आयुधे आपण जागरूकपणे वापरली तरच त्याचा उपयोग!!

# दिव्या दिव्या रे दीपत्कार!

– **शोभा नाखरे, ज्येष्ठ लेखिका, निवेदिका**

कोकणातलं कौलारू घर. संध्याकाळची कातरवेळ... वीजेचा लपंडाव... चोहीकडे मिट्ट काळोख दाटून राहिलेला... डोळ्यात बोट घातलं तरी पत्ता लागणार नाही, असा काळोख! घरातल्या आजीने कोनाड्यातल्या देवापुढे तेलाचा दिवा लावला. क्षणार्धात सारं घर उजळून निघालं. मुंबईत असा काळोख अनुभवायलाच मिळत नाही. मात्र गावी ही विलक्षण अनुभूती येते. आकाशातल्या चंद्रकोरीच्या साक्षीनं लहानपणी सर्व भावंडांनी, अंगणात, नाहीतर देवासमोर बसून एकत्र म्हटलेलं शुभंकरोति, परवचा आठवतात.



दिव्या-दिव्या रे दीपत्कार । कानी कुंडल मोतीहार ।
दिव्याला पाहून नमस्कार । दिवा जळे देवापाशी ।
उजेड पडला तुळशीपाशी । माझा नमस्कार सर्व देवांपाशी ।।

शेणाने सारवलेल्या अंगणात तुळशी वृंदावनाच्या, कोनाड्यातला पिटुकला दिवा आठवला. मनाचे श्लोक म्हणताना – "प्रभाते मनी राम चिंतीत जावा..." ही ओळ म्हणताना मला तेव्हा राग यायचा. माझ्या ताईचं नाव 'प्रभा'. 'प्रभाते मनी' म्हणताना "देवाच्या स्तोत्रात ताईचं नाव आहे, माझं नाव का नाही? आपण देवाला आवडत नाही का?" अशा विचाराने मी मनातल्या मनात 'शोभा ते मनी' म्हणत असे. बालसुलभ मनाची अशी गंमत असते!



आम्ही मुलं, आतुरतेने दिवाळीची वाट पहायचो, कारण ओळीने लावल्या जाणाऱ्या पणत्या! डोळ्यात तो लख्ख उजेड साठवून ठेवायचा, त्याच्या प्रकाशाने मनाच्या आनंदज्योती वर्षभर तेवत नि आनंदत रहायच्या. कारण **'उजेडात होते पुण्य, अंधारात पाप!'** प्रकाश म्हणजे आनंद, स्वच्छता, निर्भयता, पारदर्शकता, प्रामाणिकता, त्यामुळे अंधार दूर होतो. प्रकाश म्हणजे अंतर्ज्ञान व बाह्यज्ञान! अथ दीप भव!

'अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे!'

प्रकाशामुळे कल्याण होते. तनामनाचे आरोग्य चांगले राहते. आपोआप धनसंपदा येते. म्हणूनच आपल्या भारतीय संस्कृतीत दिव्यांना खूप महत्त्व आहे.

सर्वात्मका शिवसुंदरा, स्वीकार या अभिवादना ।
तिमिरातुनी तेजाकडे, प्रभू अमुच्या ने जीवना!

असे कुसुमाग्रज यांनी लिहून ठेवले आहे.

दीप अमावास्येला घरातले सर्व दिवे लख्ख करून पूजा केली जाते. घराचा प्रत्येक कोपरा प्रकाशमान होऊन, दारिद्र्यरुपी अज्ञानरुपी अंधःकार दूर व्हावा; घरात प्रेम, सुखसमृध्दी नांदावी, ही प्रतिकात्मकता यापाठी असणार.

दिव्या दिव्याची ज्योत सांगते, तुझी नि माझी प्रीती!... दिवा आणि प्रेम यांचंही नातं असतं. घरात कोणताही सण-समारंभ, वा जन्म-मृत्यूचा प्रसंग, दिवा हवाच. आपलं अगदी घट्ट नातंच आहे, त्याच्याशी. मग ती ज्योत पणतीची वा मेणबत्तीची! पूजनीयच मानली जाते. दिव्यांचे प्रकार तरी किती! पितळी, दगडी, चांदीचे, मातीचे, काचेचे, स्टीलचे..! अशा पारंपरिक दिव्यांपासून, विद्युत रोषणाई, एल.ई.डी.दिवे, सेन्सर दिवे अशा व्याप्तीचा प्रवास अनोखाच.



मागोवा घेतला असता, इ.स.पूर्व साधारण ७०,००० वर्षांपूर्वी शेवाळाचा वातीसारखा उपयोग करून दगडाच्या खोलगट भागात प्राण्यांची चरबी, वनस्पती, बियांचे तेल यापासून दिवा लावायची कला आदिमानवाने अवगत केली होती. पुढे कधी शिंपल्यात, अंड्याच्या कवचात, नारळाच्या करवंटीत दिवा लावणे सुरू झाले. पुढे माती भाजून पणत्या वापरात आल्या. वेद, पुराणं, रामायण-महाभारतासम ग्रंथातही दिव्यांचा उल्लेख आहे. त्यावेळी कासे, तांबे, पितळ, चांदी, अगदी सोन्यापासूनही केलेले दिवे वापरले जायचे. तूप, तेल, केरोसीन, वायू, इंधन असा ज्वलनाचा प्रवास असला तरी, वास्तुशास्त्रानुसार देवासमोर तूप वा तिळाच्या तेलाचा उपयोग शुभ मानतात. निरांजनात कापसाची फुलवात, गोल दिव्यात पिळाची वळलेली वात, निरांजन, समई, टांगायचा लामणदिवा, पंचारती,



नंदादीप; कितीऽऽ प्रकार! दिवा खूपवेळ तेवत ठेवायचा, तर डमरूसारखा दिवा! गॅसबत्तीसारखी काच, किंवा घुमटाकार नक्षीचं जाळीदार झाकण असलेले दिवे! सोळाव्या-सतराव्या शतकापासून दक्षिण भारतात असे दिवे पहायला मिळतात. त्यावर देवदेवता, प्राणी यांची चित्रे कोरलेली असतात.

तीळाचं तेल, कापसाची वात, दिवा तेवो मध्यानरात!
घरातली इडा-पिडा बाहेर जावो, बाहेरची लक्ष्मी घरात येवो॥

वात आणि तीळ तेल या मिश्रणाने घरात चैतन्य, सकारात्मक स्पंदनं निर्माण होतातच. आयुर्वेदात तीळतेल वात संतुलित करायला व त्वचा, सांधेदुखीवर गुणकारी मानले जाते.



दिव्याचा उजेड दूरवर पसरला जायला स्टँडचा आधार असलेले कलाकुसरीचे दिवे पूर्वापार लोकप्रिय आहेत. 'दिवठाण' म्हटलं जायचं त्याला. दिवा धरण्यासाठी मुठीचे आकार प्राणी-पक्षी, होडीसम असत. यातूनच पुढे समईचा जन्म झाला असावा. साधारण ४५०० वर्षांपूर्वी ताम्रयुगीन दिवे पॅलेस्टाईन भागात सापडले. रोमन दिवा १५०० वर्षे इतका जुना आहे. तिथे ऑलिव्ह तेल, माशाचं तेल, मधमाश्यांचं मेण इंधन म्हणून वापरलं जाई.



भारतात समईला जुना इतिहास आहे. राजांच्या राजवाड्यात, दिवाणखाने, शय्यागृह ते बागेपर्यंत सर्वत्र ५ ते १० फुटांच्या समया, नंदादीप, लामणदिवे असत. या दिव्याव्यतिरिक्त अर्चनादीप, कुबेरदीप, गणेशदीप, कामाक्षीदीप, दीपलक्ष्मी असे दिव्यांचे प्रकार होते. दक्षिणेतील, ओरिसातील काही देवळांत असे दिवे आढळतात. दीपलक्ष्मी दिव्यामध्ये स्त्रीच्या शरीराचा कमनीय आकार दिव्याला दिलेला असतो. ही दीपलक्ष्मी कधी उभी, तर कधी आसनस्थ! दिव्याची उंची एक-दीड फुटापासून दोन मीटर असते.

दीपवृक्ष हा आणखी एक प्रकार! अनेक फांद्या असलेला हा दिवा! त्याच्या टोकावर खोलगट दीपपात्र असतात. दीपलक्ष्मीप्रमाणे गजलक्ष्मी हा लामणदिवा! याची टांगती साखळीही नक्षीदार असते. लामण दिव्यातही वैष्णवदीप, मयूरदीप, शंखदीप, कमानदीप असे विविध कलात्मक प्रकार आढळतात. दिव्यांचे हे प्रकार बघताना कुसुमाग्रजांचे शब्द नकळत ओठावर येतात-



दिवा दिसताच प्रकाश मागणे,
पक्षी दिसताच आकाश मागणे
असला छंद बरा नाही,
ज्योती जळतात माझ्याचसाठी,
पाखरं उडतात माझ्याचसाठी
असला समज खरा नाही...

घेण्यादेण्याची भाषा जिथे संपते, ते असतात सीमेवरती लढणारे आपले जवान! कोणत्याही वादविवादात न पडता अखंडपणे आपली रक्षकाची भूमिका सातत्याने चोख बजावत असतात. 'अनाम वीरा' कवितेत कुसुमाग्रज म्हणतात-

अनामवीरा जिथे जाहला, तुझा जीवनांत
स्तंभ तिथे ना कुणी बांधिला, पेटली ना वात!

ते शेवटी लिहित्तात-

काळोखातूनि विजयाचा ये पहाटचा तारा
प्रणाम माझा पहिला तुजला, मृत्युंजय वीरा!

अशाच आशयाच्या प्रेरणादायी ओळी मंगेश पाडगांवकर यांच्याही आहेत-

घनघोर तिमिर असताना ते ज्योत होऊनी जळले
घेऊन वीज प्राणांची ते जुलमावर कोसळले
घरदार सोडिले त्यांनी, तोडिले पाश मायेचे
घेतले निखारे हाती, उधळून छत्र मायेचे
त्या अनाम वीरांसाठी हा दिवा लाविते आहे-
त्या स्मृतीवरी शूरांच्या, ही फुले ठेविते आहे.

शूरवीरांच्या त्यागाशी ज्योतीचे प्रतीक असे जोडलेले आहे!

गोव्याच्या शंकर रामाणी यांचे शब्द, पद्मश्री पद्मजा फेणाणी यांच्या सुरात ऐकायचा आनंद आगळाच! मनातली उदासी दूर होतेच ते

ऐकताना!

दिवे लागले रे दिवे लागले रे, तमाच्या तळाशी दिवे लागले.
दिठीच्या दिशा खोल तेजाळताना, कुणी जागले रे कुणी जागले



एडिसनने विजेच्या दिव्याचा शोध लावला. बल्ब ही क्रांती होती. पुढे तंत्रज्ञानात अनेक सुधारणा होत गेल्या. हॅलोजन दिवे, एचडीएल, आता एलईडी दिवे वापरात आले आहेत. ६० वोल्टच्या साध्या दिव्याला पर्याय म्हणून शोधलेला मंद (डीम) करता येणारा दिवा शोधून, फिलिप्सने अमेरिकन उर्जा खात्याने ठेवलेले मिलियन डॉलरचे बक्षिस जिंकले. असे बदलाचे वारे वहात असूनही, संध्याकाळी दमून-भागून घरी आल्यावर देवापुढची शांत निरांजनाची ज्योत पाहून मन शांत होते, असा तुमचाही अनुभव असेल.

परि स्मरते आणिक करते व्याकुळ तेव्हा
त्या माजघरातील मंद दिव्याची वात!

हे कुसुमाग्रजांचे शब्द नकळतपणे ओठावर येतात. नि बालपणी म्हटलेले शब्द मनात उसळी मारून आठवतात-

दिव्या-दिव्या रे दीपत्कार, कानी कुंडल मोती हार
दिव्याला पाहून नमस्कार, दिवा जळे देवापाशी
उजेड पडला तुळशीपाशी।।

“लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया, झळाळती कोटी ज्योती या..” असा लखलखाट शहरांमध्ये अनुभवताना, गावात अजूनही ‘लोडशेडिंग’ असतं, याची मनात सतत जाण ठेवून व्यक्तिगतरित्या गरज नसताना, दिवे-पंखे बंद करावे, ही जाण ठेवणं, इतकं भान असू द्यावं. पुरेसा सूर्यप्रकाश असताना, वीजेची गरज नसताना बचतीसाठी यत्न व्हावेत; ही सुजाण ग्राहक म्हणून आपली नक्कीच जबाबदारी आहे. दिव्यांची रांगच-रांग आखणारी ती दीपावली! (आवली=रांग) भाद्रपद संपला की, नवधान्यांनी, फळाफुलांनी बहरलेला, रंगारंगांच्या नवलनयनोत्सवांनी नटलेला, आनंद अन् उत्साहाने डवरलेला असं गंधित मोहमयी रूप लेवून येतो तो आश्विन. आनंद, सुख-समृध्दी, तृप्ती सारं घेऊन येणारा! उंच आभाळ सोडून, धरतीच्या जवळ आलेला शरदाचा चंद्र; आणि देवलोकाचाही अंधार दूर करण्यासाठी उंच आभाळात गेलेला आकाशदिवा एकत्र येण्याचा योग म्हणजे अश्विन मास! रानमळ्यातली हिरवी पिवळी आबादानी, तृप्तीच्या तेजानं घमघमू लागते. पाकोळ्या, फुलपाखरांना हे आधीच कळतं. रातकिडे, काजवे, पाकोळ्या जणू आधीच दिवाळी साजरी करतात-

पिवळी भाते घमघमती । वरी काजवे चमचमती ।।

म्हणूनच आश्विन-कार्तिकाच्या संधीकालात येतो हा दिव्यांचा उत्सव!

दीप्यते, दीपयति वा स्वयं परं च इति।

म्हणजे स्वतः प्रकाशतो आणि दुसऱ्यांना प्रकाशित करतो तो दीप! दीप किंवा दीपज्योत हे बुध्दी आणि ज्ञान याचे प्रतीक! “तमसो मा ज्योतिर्गमय” अज्ञानरुपी अंधःकारातून ज्ञानरूपी प्रकाश ज्योतीकडे ने, असा यातील गर्भितार्थ!

आश्विन-कार्तिकाच्या संधीकालात हा दीपोत्सव येतो. हिंदूंच्या अन्य सणात एकाच देवतेचं पूजन असतं. पण दीपावलीत रोज नवनव्या देवतेचं पूजन असतं. धनत्रयोदशी दिवशी यमदेवतेचं पूजन केलं जातं. यमाची दिशा दक्षिण, ती अशुभ मानली जाते. एरवी दिवा कधी दक्षिणाभिमुख ठेवत नाहीत. या दिवशी यमराजाला दीपदान केलं, तर घरात कोणाला अपमृत्यू येत नाही असा समज आहे. आयुर्वेदाचा प्रवर्तक धन्वंतरी याचा जन्मदिन त्याचीही जयंती साजरी केली जाते.



नरक चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून दारात पणती, दिवा लावला जातो. मग उटणं, तेल लावून स्नान! हा दिवस ‘सामुदायिक आतिथ्याचा’ मानतात. ज्या घरी दिवा पेटत नाही, तिथे, त्या घरात आपल्या घरचं थोडं गोडधोड न्यावं, ही एक चांगली प्रथा आहे. आश्विन अमावस्या या दिवशी सर्वत्र संचार करणारी लक्ष्मी निवासासाठी जागा शोधते. ज्या घरात स्वच्छता, रसिकता, प्रयत्नांची पराकाष्ठा, जिद्द संयम आहे, त्या घरात ती आकर्षित होतेच. पण ज्या घरात चारित्र्य संपन्न, धर्मनिष्ठ, क्षमाशील पुरुष अन् स्नेहशील, गुणवान, ज्ञानसंपन्न स्त्रिया वास करतात, तिथेच लक्ष्मीला वास्तव्य करायला आवडते, असे मानले जाते. म्हणून नवीन केरसुणी आणून पूजा केली जाते. अमंगल, अस्वच्छ झाडून, कचऱ्यावर दिवा लावला जातो. व्यापारी लोक चोपडा पूजन, महालक्ष्मीची पूजा करतात.

यमद्वितीया भाऊबीज हा बहीण-भावाचं नातं गहिरं करणारा दिवस! त्यायोगे कौटुंबिक भावबंध, स्नेहबंध दृढ करणारा सण! निर्मळ मनाने एकत्र आनंद साजरा करताना दिव्याने बहीण भावाला ओवाळते! सीमेवरच्या वीरांनाही आठवण्याचा हा दिवस!

दिवाळी निमित्त शिवरायांचा पराक्रम, शौर्य यांना सलाम करायला मातीचे किल्ले बाल-गोपाळ बनवतात. देशप्रेमाचे संस्कार, सैन्यात जायची आवड, बालपणापासून मनात रुजवणारा सोहळा! त्या किल्ल्यांवरचे दिवे मनात देशभक्ती जागवतात.

माहिती तंत्रज्ञानाच्या आजच्या जगात हात पसरून, किती ज्ञान कवळू, ते कमीच! आजचं जग स्पर्धात्मक झालं आहे, आपल्याला ज्ञानाचा दीप सतत उजळत ठेवण्याला पर्याय नाही.

ज्ञानाच्या मार्गावर, प्रगतीकडे नेणारा, आतिथ्य जपणारा, समाजभान देणारा दिवाळी सण!

दिवाळी येणार आनंद होणार घरोघरी
तुमच्या घरी अन् आमुच्या घरी!!

सर्वांच्या घरी आनंद पेरला जातोय ना हे बघण्याचे भान देणारी दिवाळी आपण साजरी करूया!

**मिणमिणत्या पणत्या ते दिव्यांच्या विविध प्रकारच्या माळांनी सध्या बाजारपेठ भरलेली आहे. अशात आपल्या पंचायत पेठेतल्या सागर पाटील यांचे कौतुक वाटते. स्वतः दृष्टीहीन असलेला सागर पाटील पर्यावरणपूरक दिवे बनवून विकतो.**

# ‘ग्राहक भवन’चा जुहू येथील भूखंड बिल्डरला आंदण देण्याचा महापालिका अधिकाऱ्यांचा डाव फसला

**– ॲड. शिरीष देशपांडे, कार्याध्यक्ष**

बिल्डर्सच्या तालावर नाचणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांनी मुंबई ग्राहक पंचायतीला स्वखर्चाने आणि कायदेशीररित्या बांधलेल्या ‘ग्राहक भवन’ या त्यांच्या स्वतःच्याच इमारतीत ‘ट्रेसपासर’ आणि ‘अनधिकृत कब्जेदार’ ठरवून या वास्तुतून निष्कासित करण्याचा ११ एप्रिल २०२३ रोजी दिलेला मनमानी आदेश मुंबई शहर दिवाणी न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश श्री. अनिल सुब्रमण्यम यांनी नुकताच रद्दबातल घोषित केला आहे.

या प्रकरणाची थोडक्यात पार्श्वभुमी अशी आहे. १९८६ मधे महापालिकेने मुंबई ग्राहक पंचायतीला जेव्हिपीडी स्किम येथे ५००० चौ.फुटांचा भुखंड स्वतःची इमारत बांधण्यासाठी सुरवातीला १० वर्षांच्या मक्ता करारावर दिला. त्या भुखंडावर ग्राहक पंचायतीने सर्व कायदेशीर बाबींची रीतसर पूर्तता करून ‘ग्राहक भवन’ ही अडीच मजली स्वतःची वास्तू १९८९ मधे बांधली. त्यानंतर या मक्ता कराराचे महापालिकेने ३१ डिसेंबर २०३० पर्यंत नुतनीकरणही केले.

दरम्यान ‘ग्राहक भवन’ लगतच्या महापालिका मंडईच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव ‘सुचेता कंस्ट्रक्शन’ या बिल्डरने महापालिकेला दिला असता ‘ग्राहक भवना’चा भूखंड वगळून पुनर्विकासाला महापालिकेने परवानगी दिली. परंतू जुहू सारख्या उच्चभ्रू वस्तीतील जागेचे कडाडलेले भाव लक्षात घेता बिल्डरला ‘ग्राहक भवना’चा भूखंड सुध्दा हवासा झाला. त्यासाठी सर्व मांडणी झाली आणि २०१७ मधे तत्कालीन आयुक्त अजोय मेहता यांनी ग्राहक पंचायतीचा डिसेंबर २०३० पर्यंतचा असलेला मक्ता करार तडकाफडकी, कोणतीही पूर्व सूचना न देता एकतर्फी रद्दबातल करून बिल्डरला या भूखंडावरही पुनर्विकास करण्याचा परवाना दिला. अजोय मेहतांना मुंबई ग्राहक पंचायतीने व्यक्तिश: भेटून ही विचित्र बाब त्यांच्या लक्षात आणून दिल्यावर एक उपचार म्हणून हा मक्ता करार रद्द का करू नये म्हणून ‘कारणे दाखवा’ नोटीस बजावली. म्हणजे आधी करार रद्द करायचा आणि मग ‘कारणे दाखवा’ नोटीस बजावायची! साहजिकच या कारणे दाखवा नोटीसीला सविस्तर उत्तर दिल्यानंतरही आयुक्तांनी आपला आधीचाच निर्णय कायम ठेवला. मात्र मुंबई ग्राहक पंचायतीवर आपण फार मोठे उपकार करत आहोत या थाटात नव्या पुनर्विकासात सध्या आहे तेवढीच जागा ‘भाडेकरू’ म्हणून देऊ केली. आणि हे मान्य नसल्यास ग्राहक पंचायतीला या भूखंडावर ‘अतिक्रमण करून अनधिकृत कब्जा केल्याच्या कारणास्तव निष्कासित करण्यात येईल’ अशी नोटीस ग्राहक

पंचायतीला महापालिका कायदा कलम १०५(ब) अंतर्गत बजावली जाईल अशी लेखी धमकीही देण्यात आली.

मुंबई ग्राहक पंचायतीने पुनर्विकासास विरोध नसल्याचे कळवत स्वतःच्याच जागेत "भाडेकरू" म्हणून पुनर्विकास प्रकल्पात सहभागी होण्यास मान्यता न दिल्याने शेवटी आयुक्तांनी १०५ (ब) अंतर्गत नोटीस बजावली. आयुक्त नियुक्त चौकशी अधिकारी यांनी सुनावणी घेतली. सदर मक्ता कराराचे नुतनीकरण ३१ डिसेंबर २०३० पर्यंत केले असले तरी ते सुधार समितीच्या मान्यतेच्या शर्तीच्या आधीन राहून होते आणि सुधार समितीने तशी मान्यता दिली नसल्याने सदर मक्ता कराराचे नुतनीकरण डिसेंबर २०३० पर्यंत झालेले आहे असे म्हणता येणार नाही अशी भूमिका महापालिकेने घेतली. तसेच पुनर्विकासात मुंबई ग्राहक पंचायतीने सहकार्य करण्याचे आश्वासन पाळले नाही असाही युक्तीवाद महापालिकेतर्फे केला. त्यावर मुंबई ग्राहक पंचायतीचे मुद्दे/आक्षेप विचारात न घेताच चौकशी अधिकाऱ्याने महापालिका आयुक्तांचा मुळ आदेश ग्राह्य धरत ४ मार्च २०२१ ला मुंबई ग्राहक पंचायतीला स्वत:च्याच ग्राहक भवनात "ट्रेसपासर" ठरवत ३० दिवसांत ग्राहक भवनाचा ताबा महापालिकेला देण्याचे बजावत निष्कासनाचा आदेश जारी केला.

महापालिकेच्या बिल्डर प्रेरीत या निर्णयाला मुंबई ग्राहक पंचायतीने शहर दिवाणी न्यायालयात आव्हान दिले. ज्या प्रकारे चौकशी अधिकाऱ्याने सुनावणी घेतली ती आक्षेपार्ह आणि अयोग्य असल्याचे सांगून दिवाणी न्यायालयाने चौकशी अधिकाऱ्याचा तो आदेश रद्दबातल करत फेर-सुनावणीचा आदेश दिला. परंतु पुन्हा एकदा त्याच नाटकाचा दुसरा प्रयोग झाला आणि चौकशी अधिकाऱ्याने मुंबई ग्राहक पंचायतीला स्वत:च्याच वास्तुत अतिक्रमण करून अनधिकृत कब्जा केल्याचे घोषित करून पुन्हा एकदा ११ एप्रिल २०२३ च्या आदेशाद्वारे ३० दिवसांत ग्राहक भवनाचा ताबा महापालिकेला देण्याचा दुसऱ्यांदा आदेश दिला.

या विचित्र आणि अन्य हेतूने प्रेरीत अशा आदेशाला मुंबई ग्राहक पंचायतीने नव्याने शहर दिवाणी न्यायालयात आव्हान दिले. यावर नुकतीच सुनावणी होऊन महापालिकेचा सदर मनमानी आणि बिल्डर धार्जिणा आदेश शहर दिवाणी न्यायालयाचे प्रमुख न्यायमुर्ती श्री. अनिल सुब्रमणियम यांनी १३ ऑगस्ट २०२५ रोजी रद्दबातल घोषित केला आहे.

सदर निकालपत्रात दिवाणी न्यायालयाने तत्कालीन महापालिका आयुक्त (अजोय मेहता) यांनी २०१८ मधे ज्या मनमानीपणे एकतर्फी, कोणतीही पूर्व सूचना न देता मुंबई ग्राहक पंचायतीचा डिसेंबर २०३० पर्यंत नुतनीकरण केलेला मक्ता करार (lease agreement) ज्या विचित्र पध्दतीने रद्द केला त्याबद्दल आश्चर्य आणि संशयही व्यक्त केला असून अशा प्रकारे करार रद्द होऊ शकत नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच एकंदरीत पत्रव्यवहार आणि कागदपत्रे लक्षात घेता मुंबई ग्राहक पंचायतीने पुनर्विकासात सहकार्य केले नाही असे म्हणता येणार नाही असेही निरीक्षण नोंदवले असून हा सर्व जेव्हिपिडी महापालिका मंडई पुनर्विकास हा एका बिल्डरच्या पुढाकाराने होत असून महापालिकेची यातील भूमिका ही संशयास्पद असून महापालिकेपेक्षा बिल्डरच्या साहाय्यासाठी ही सर्व कृती केली जात असल्याचे दिसून येत आहे असेही गंभीर निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. त्याचप्रमाणे मुंबई ग्राहक पंचायतीने माहिती कायद्यानुसार महापालिकेकडून मिळवलेल्या कागद पत्रात महापालिका सचिवांनी महापालिका आयुक्तांना सदर मक्ता करार नुतनीकरणाचा सुधार समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव सादर केला असता सदर प्रस्तावावर स्वाक्षरी नाही या पलिकडे कोणताच समाधानकारक खुलासा न केल्याची टिपणीसुध्दा न्यायालयाने केली आहे.




तसेच मुंबई उच्च न्यायालयाने सदर महापालिका मंडईसह जेव्हिपिडी मधील सर्व भूखंड हे म्हाडाने येथील १४ सहकारी गृह संस्थांना १९६० मधेच रीतसर मालकी हक्कांसह हस्तांतरीत केल्याचा निर्णय जून २०२४ मधे दिला असल्याने महापालिकेच्या एकूण मालकी हक्कांबद्दलच  प्रश्नचिन्हे असल्याची जाणीव महापालिकेला या निकालपत्रात जाता जाता करून दिली आहे. त्यामुळे आता बिल्डरच्या आग्रहाखातर मुंबई ग्राहक पंचायतीला निष्कासित करण्याचा महापालिकेचा डाव उधळला गेला असून महापालिकेला स्वतःलाच या भूखंडावरील स्वत:चा मालकी हक्क सिध्द करण्याची वेळ आली आहे.

दिवाणी न्यायालयात संस्थेतर्फे ॲड. निरंजन भडंग, ॲड. वृषाली कबरे, ॲड. पूजा जोशी-देशपांडे आणि ॲड. शिरीष देशपांडे यांनी गेली ४ वर्षांहून अधिक काळ ही न्यायालयीन लढाई दोन टप्प्यांत यशस्वीपणे लढवली. या सर्व लढ्यात डॉ. अर्चना सबनीस, शर्मिला रानडे, अनुराधा देशपांडे तसेच आर्किटेक्ट्स अरुण जोगळेकर, प्रफुल्ल शहाणे आणि योमेश राव यांचेही महत्त्वाचे योगदान आहे.

# नागालँडमधील कॉफी बोर्डाच्या बैठकीचा अविस्मरणीय अनुभव

– ॲड. शिरीष देशपांडे, कार्याध्यक्ष

कॉफी बोर्डाचा संचालक म्हणून माझा २ ते ५ सप्टेंबरला नागालँडचा दौरा झाला. हा दौरा नागालँड सरकारच्या खास निमंत्रणावरून कोहिमा येथे आयोजित केला होता. त्यामुळे आम्ही सर्व संचालक हे नागालँडचे शासकीय पाहुणे होतो.

आपल्याकडे Coffee Act आणि Tea Act असे दोन फार जुने कायदे अस्तित्वात आहेत. या दोन्ही कायद्यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे या दोन्ही केंद्रीय वैधानिक मंडळांवर ग्राहक संस्थांना प्रतिनिधीत्व आहे. त्यानुसार २०२२ मधे केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या शिफारसीनुसार मुंबई ग्राहक पंचायतीचा कार्याध्यक्ष या नात्याने ग्राहक प्रतिनिधी म्हणून कॉफी बोर्डच्या संचालक मंडळावर माझी नेमणूक झाली आहे. या संचालक मंडळाच्या बैठका बंगळुरु या कॉफी बोर्डाच्या प्रमुख कार्यालयात होत असतात. परंतु नागालँड सरकारच्या खास आग्रहाखातर सप्टेंबरमधील ही बैठक कोहिमा येथे आयोजित केली होती.

कोहिमा ही नागालँडची राजधानी. पण तिथे विमानतळ नाही. त्यामुळे दिमापूर विमानतळावर उतरल्यावर ७० किमी अंतरावरील कोहिमाचा प्रवास हा डोंगराळ, नागमोडी रस्त्याने करावा लागतो.

या संपूर्ण दौऱ्यात तेथील मुख्यमंत्री डॉ. एन. रिओ यांचा औपचारीक नव्हे तर मनापासून सहभाग बघायला मिळाला. डॉ. रिओ हे नागालँडमधील मुरलेले राजकारणी म्हणून ओळखले जातात. तेथील आदिवासींच्या हिंसक आंदोलनांना पुरुन उरलेली आणि तीन टर्म्स मुख्यमंत्री म्हणून पद भुषवलेली ही व्यक्ती अभ्यासू आणि सहज संवाद साधणारी वाटली. सुसंस्कृत राजकारणी या एक दुर्मीळ होत चालेल्या जमातीतील मुख्यमंत्री असे निदान प्रथमदर्शनी तरी त्यांच्या बोलण्या, वागण्यातून चित्र उभे राहिले.

आमच्या मूळ कार्यक्रमानुसार संचालक मंडळाची बुधवारची सकाळ पासून भोजनापर्यंतची बैठक झाल्यानंतर संपूर्ण संचालक मंडळ दु. ३ वा मुख्यमंत्र्यांना भेटायला त्यांच्या बंगल्यावर जाणार होते. पण दु. १२ वा निरोप आला की संचालक मंडळाची बैठक चालू असलेल्या




नागालँडचे मुख्यमंत्री डॉ. एन. रिओ यांच्याकडून सन्मानित होऊन त्यांच्याशी चार शब्द बोलताना

हॉटेलमधे मुख्यमंत्री स्वतःच संचालक मंडळाला भेटायला आणि संवाद साधायला येत आहेत. विधानसभेचे अधिवेशन चालू असूनही वेळात वेळ काढून कॉफी बोर्डच्या संचालक मंडळाशी स्वतः संवाद साधायला येणं यातच त्यांचं राजकीय चातुर्य दिसून येतं.

कॉफी बोर्डाच्या संचालक मंडळाशी संवाद साधताना मुख्यमंत्री डॉ. रिओंनी स्वतःकडे कमीपणा घेत आपल्याला कॉफीबद्दल फारसं काही कळत नाही, असे सांगत नागालँडची भूमी ही नैसर्गिक साधन संपत्तीने संपन्न अशी असल्याने कॉफीची लागवड इथे बहरलेली असली तरी येथील स्थानिक आदिवासी शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी कॉफी बोर्डाने सहकार्य करावे असे भावनेला हात घालणारे आवाहन याप्रसंगी केले.

नागालँडमधे शेतीसाठी रासायनिक खते वापरण्यास बंदी असल्यामुळे येथील कॉफी ही by default organic असते, हे सुध्दा मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितले. त्यानंतर संचालक मंडळ आणि कॉफी उत्पादकांच्या बैठकीत मी हाच मुद्दा उचलून धरत नागालँडमधील कॉफी ही खऱ्या अर्थाने नैसर्गिक आणि organic म्हणून तिची ओळख कॉफी बोर्डाने देशभर करून तशी प्रसिध्दी देण्याचा मुद्दा मी मांडला. किंबहूना याच बैठकीत काही स्थानिक उत्पादकांनी कॉफीचे उत्पादन वाढवण्यासाठी रासायनिक खतांचा वापर करण्यास नागा शासनाने अनुमती द्यावी अशी सूचना केली. त्यास मी ठाम विरोध दर्शवून रासायनिक खतांमुळे होणारे



कॉफी बोर्ड सदस्यांचे स्वागत, पारंपरिक पद्धतीने

धोके दर्शवत नैसर्गिक कॉफी उत्पादनाची कास नागा सरकारने सोडू नये असा विचार मी यावेळी आग्रहाने मांडला.

नागालँडमधील नैसर्गिक कॉफीचे उत्पादन हे 'उत्पादक शेतकरी' आणि 'ग्राहक' या दोघांच्याही कसे हिताचे आहे (Win-Win) हे मी अधोरेखीत केले. माझ्या या विचाराचे नंतर दोन दिवस सर्वांकडून स्वागत आणि कौतुक होताना दिसून आले. अनेक उत्पादक तसेच संबंधित शासकीय अधिकारी मला नंतर प्रत्यक्ष भेटून मी ज्या पध्दतीने organic कॉफीचा मुद्दा मांडला, त्याचे भरभरून कौतुक करत होते.

या बैठकीत मी चिकोरी मिश्रित कॉफीत चिकोरीची सध्याची कमाल मर्यादा ४९ % वरून ३० टक्क्यांवर आणण्याच्या कॉफी बोर्डाच्या प्रस्तावावर फेरविचार व्हावा अशी मागणी केली. चिकोरीचे प्रमाण कमी केल्यास कॉफीचे प्रमाण आपसुक वाढणार असल्याने त्यातील कॅफिन कंटेंट वाढणार असल्यामुळे ग्राहकांच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने ही चिंतेची बाब असू शकते असे सांगून मी याबाबत चिकोरीचे प्रमाण कमी केल्यास चिकोरी मिश्रित कॉफीची किंमत सहाजिकच वाढल्यामुळे कॉफीची मागणी वाढवण्याच्या दृष्टीने त्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो हे या सभेत आवर्जून सांगितले. या विषयावर बरीच साधक बाधक चर्चा रंगली.

मुख्यमंत्री डॉ. रिओ यांनी विधानसभा अधिवेशन चालू असतानाही कॉफी बोर्डाच्या संचालकांना भेटायला येण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी वेळ तर काढलाच पण त्याशिवाय नागालँडचा खास दुपट्टा आम्हा प्रत्येक संचालकाच्या खांद्यावर चढवून सन्मान करत वैयक्तिकरीत्या प्रत्येक संचालकाची विचारपुस केली. ही त्यांची कृती खुप काही सांगून गेली. नागालँडमधे कॉफी लागवडीला उत्तेजन देण्याचे उद्दिष्ट ठेवून कॉफी बोर्ड या केंद्रीय वैधानिक मंडळाच्या संचालक मंडळाच्या आगत-स्वागतात कोणतीही कमी राहणार नाही याची खबरदारी स्वतः मुख्यमत्र्यांनी जातीने घेतल्याचे या चार दिवसांच्या दौऱ्यात पदोपदी जाणवत होते. दिमापूर विमानतळावर उतरल्यापासून ते परत दिमापूरहून उड्डाण करेपर्यंत शासकीय यंत्रणा आमच्या संपूर्ण दिमतीला होती. नागालँडचे ऐतिहासिक संस्कृती दर्शन डॉ. रिओंनी त्यांच्या छोटेखानी भाषणात तर केलेच, शिवाय ते प्रत्यक्ष दर्शवणारा एक विशेष सांस्कृतिक कार्यक्रमसुध्दा आयोजित केला होता.

दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी कॉफी लागवडींना भेट देण्याचा कार्यक्रम होता. या सर्व लागवडी डोंगरावर. किंबहूना संपूर्ण नागालँड हा डोंगराळ प्रदेश. खरा निसर्ग म्हणजे काय हे बघायचे तर नागालँडला जावे. सर्व डोंगरांनी हिरवी गार शाल पांघरलेली. उंच उंच डोंगर, तितक्याच खोल खोल दऱ्या. आणि या सर्व डोंगराळ प्रदेशातून आमचा जवळ जवळ ४० शासकीय गाड्यांचा ताफा, पुढे पायलट कार, तर शेवटी इमर्जन्सी उद्भवल्यास आवश्यक म्हणून एक सुसज्ज ॲम्ब्युलन्स, अशा प्रोटोकोलने मैलो न् मैल रस्ता नागमोडी वळणे घेत घेत चक्क सुसाट धावत होता. या नागमोडी वळणांची खासियत म्हणजे एकतर इंग्रजी S किंवा चक्क U अशी ही वळणे आणि ती सुध्दा प्रत्येक दिडशे ते दोनशे मीटरच्या अंतरावर. अशा मार्गावर गाडी चालवणे म्हणजे खरंच जोखमीचे. पण तिथले सर्वच ड्रायव्हर्स इतके निष्णात की S आणि U turnवर सुध्दा हे पठ्ठे ४० ते ५० km वेगाने गाड्या अगदी लिलया नागासारख्याच वळवत होते. वेगात धावणाऱ्या या शासकीय गाड्या एकमेकांपासून मात्र व्यवस्थित अंतर राखून धावत होत्या की जेणेकरून अशा ताफ्यांमध्ये होणारे साखळी अपघात टळू शकतात. हे सर्व पाहून मनात विचार आला की सरकारने याच आपल्या ड्रायव्हर्सना आणखी प्रशिक्षित केले, त्यांच्या शारीरिक क्षमता वाढवल्यास 'फॉर्म्युला वन' (F 1) सारख्या जागतिक कार रेसिंग स्पर्धेत भारत आपले नाव कोरल्याशिवाय राहणार नाही. आज आपल्याकडे एवढी ही प्रचंड क्षमता आहे. पण ती क्षमता कामी आणणं, तिचं संवर्धन आणि संगोपन करणं आणि त्याला प्रोत्साहन देण्याची गरज आहे आणि नेमकं तिथे आपण एक देश म्हणून कमी पडतो का, असा प्रश्न मनात येतो.

# पर्यावरणप्रिय गणेशोत्सव- बहुढंगी अभियान

**– रंजना मंत्री, संघटन विभाग प्रमुख**



आपल्या संस्थेच्या संघटन विभागातर्फे या वर्षी 'पर्यावरणप्रिय गणेशोत्सव अभियान' राबवण्यात आले. वेगवेगळ्या प्रकारे हे अभियान राबवले गेले.

- गणपती उत्सवात पर्यावरणाकडे लक्ष वेधण्यासाठी सभासदांना एक प्रश्नावलीचा गुगल फॉर्म पाठवण्यात आला होता.

- सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून लेझर लाईट व ध्वनीक्षेपणाच्या अमर्यादित वापरामुळे होणारे नुकसान व ध्वनिप्रदूषण टाळले जावे, यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण (MPCB) मंडळाचे तांत्रिक सहसंचालक रविंद्र आंधळे व जनसंपर्क अधिकारी संजय भुस्कुटे यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

- संस्थेच्या विविध भौगोलिक विभागांतील वॉर्ड ऑफिस व मुख्य पोलीस स्टेशन्स यांच्याकडेही याबाबतचे निवेदन विभाग समिती सदस्यांकडून देण्यात आले.

- पुणे येथील 'पुनरावर्तन' ही संस्था गेली तीन वर्षे पुणे, पिंपरी चिंचवड व ठाणे या ठिकाणी शाडू गणपतीची विसर्जित माती महानगरपालिकेच्या सहकार्यातून मूर्तीकारांपर्यंत पोहचवण्याचा प्रकल्प यशस्वीपणे राबवत आली आहे. त्यांच्याकडून या संकल्पनेची पूर्ण माहिती घेतली. हा उपक्रम संघटन विभागातर्फे के ईस्ट वॉर्ड, विलेपार्ले येथे प्रायोगिक तत्वावर राबविता यावा, यासाठी उपायुक्त प्रशांत सपकाळे यांची भेट घेतली. प्रशांत सपकाळे यांनी पूर्ण सहकार्य करण्याची तयारी दाखवली. आणि फक्त शाडू मातीच्या गणपतींचे विसर्जन करण्यासाठी के इस्ट वॉर्ड येथील हेडगेवार मैदानात स्वतंत्र तळे उपलब्ध करून देण्यात आले. यासाठी के इस्ट वॉर्डचे सहायक आयुक्त नितीन शुक्ल, सब इंजिनिअर सुशांत गोडबोले तसेच निखिल कोळेकर यांचे सहकार्य मिळाले. या उपक्रमात अक्षय स्वस्ती फाऊंडेशन संस्थेचे संस्थापक निमेश पटेल यांचाही सहभाग होता व त्यांचेही बरेच सहकार्य मिळाले. हेडगेवार मैदानातील या तळ्यात गणपती मूर्तीचे विसर्जन स्वत:च्या हातांनी करण्याचा आनंद भक्तगणांनी घेतला. या विसर्जनातून मूर्तीकार पुनर्वापर करू शकतील अशी शुध्द स्वरूपातील जवळ जवळ तीन टन माती गोळा झाली.

- या अभियानाअंतर्गत, मूर्तीचे घरच्या घरीच विसर्जन करून विसर्जित शाडू माती आणून देण्याचे आवाहन विलेपार्ले विभागातील सभासदांना करण्यात आले होते. या संकल्पनेलाही उत्तम प्रतिसाद मिळाला. १४ सभासदांनी गणेशमूर्तीचे विसर्जन घरच्या घरी करून संकलित माती सावरकर केंद्रात आणून दिली.

- संघटन विभागातील कार्यकर्त्यांनी निर्माल्य, नैवेद्य, घरच्या घरी विसर्जन यांबाबत संदेश देणारे व्हीडीओ तयार केले.

- गणेशोत्सवात फुलांची आरास कशी बनवावी, याचे मार्गदर्शन नेहा जोशी यांच्या वेबिनारच्या माध्यमातून करण्यात आले.

- सुपारीच्या चिपाडापासून बनवलेली ताटे, द्रोण इत्यादी विघटनशील वस्तूंच्या उत्पादकांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले.

- पालघर, बोईसर, विरार, मालाड, दादर-माहिम-बांद्रा, पुणे या विभागांतून शाडू मातीपासून गणपती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. विरार विभागाने कागदाची फुले बनवणे, धान्याची रांगोळी काढणे अशाही कार्यशाळा घेतल्या.

- बोरीवली, पुणे व दादर-माहिम-बांद्रा विभागातून पर्यावरणप्रिय घरगुती गणेशोत्सव स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

या संपूर्ण अभियानात संघटन विभाग कोअर समिती सदस्य वृषाली आठल्ये, ममता आठल्ये व उमा पावनगडकर यांचे सहकार्य मिळाले. वसई विभागाचे कार्यकर्ते महेश अभ्यंकर यांनी मुंबई येथील सभासदांसाठी गूगल फॉर्म बनवून देण्याचे काम केले, तर अलिबाग येथील सभासदांसाठी दहिसर विभागाचे समिती सदस्य नितीन पालकर यांनी बनवून दिला. गणेश मुर्ती बनविण्याच्या कार्यशाळेत पालघर विभागाचे माजी समिती सदस्य विनय पाटील व दादर-माहिम-बांद्रा विभाग समिती सदस्य सुनंदा भोगले यांनी मार्गदर्शन केले. चेंबूर विभाग समिती सदस्य मोक्षदा नूलकर यांनी चेंबूर येथील शिवश्रृष्टी सोसायटीतील अनेकांना सोबत घेऊन सार्वजनिक विसर्जन व निर्माल्यातील फुले दोऱ्यातून वेगळी करून खतासाठी देण्याचा उपक्रम राबविला. संदेशपर व्हिडिओचे एडिटींग अंधेरी विभागाची कार्यकर्ती शीतल पोटे यांनी केले. हे संदेशपर विडिओ रंजना मंत्री यांनी बनवले.

पार्ल्याच्या हेडगेवार मैदानातील विसर्जनाच्या नियोजनात मालाड विभागातील समिती सदस्य अरविंद स्वार व सांताक्रुझ विभागाचे कार्यकर्ते मकरंद राणे यांनीही सहभाग दिला. विलेपार्ले विभागाच्या कार्यवाह सुनेत्रा राजाध्यक्ष यांनी हेडगेवार मैदानात विसर्जनाच्यावेळी व सावरकर केंद्रात माती गोळा करण्यासाठी लागणारी कार्यकर्त्यांची फळी विभागातून उभी केली.

# पुणे वितरणतर्फे पाककला स्पर्धा

**– कल्पिता रानडे, कार्यवाह, पुणे वितरण केंद्र**

गणपती बाप्पाच्या प्रसादासाठी घरी केलेल्या पदार्थांची पाककला स्पर्धा... वैविध्यपूर्ण पदार्थ मुंबई ग्राहक पंचायतीच्या वितरणातील सामान/ पदार्थ वापरून केलेले असावेत. पुणे विभागाने पर्यावरणपूरक शाडूच्या मातीच्या गणपती मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा घेतली, पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धा जाहीर केली. संघप्रमुख ग्रुपवर हे सगळे वाचत असताना विचार आला की, बाप्पाचा प्रसाद आणि पाहुण्यांसाठी खाऊ सुध्दा आपले सभासद नक्कीच घरी करत असतील. मग आपल्या सभासदांनी केलेल्या वैविध्यपूर्ण पाककृतींना जर प्रोत्साहन दिले तर! स्पर्धा जाहीर केली. अनंत चतुर्दशी पर्यंत प्रसादाची/ पदार्थांची माहिती आणि फोटो संघाच्या व सभासदांच्या नावासहीत संघप्रमुख ग्रुपवरच द्यायला सांगितली होती. एकूण १८ सभासदांनी भाग घेतला आणि २७ पदार्थांचे फोटो आले. परिक्षक म्हणून दिप्ती जोशी, माणिक दातार आणि कल्पिता रानडे यांनी विजेत्यांची निवड केली. विजेत्यांना बक्षिसे पुण्याच्या पंचायत पेठेत जानेवारी २०२६ मध्ये देण्यात येणार आहेत.

**१) प्रथम क्रमांक : मीरा भरत बर्वे (शिव सागर संघ)**

आपल्या वाटपातील शिंगाडा पीठ व राजगिरा लाही पिठाचे मिक्स लाडू




**साहित्य** – ३ वाट्या शिंगाडा पीठ, १ वाटी राजगिरा लाही पीठ, ३ वाट्या तूप, ३ वाट्या गूळ, १ वाटी सुख खोबरं, आवडीनुसार ड्रायफ्रूट, वेलची

**कृती** – शिंगाडा पीठ व राजगिरा लाही पीठ तुपात चांगले भाजायचे. कोमट झाले की बारीक चिरलेला गूळ घालायचा. ड्राय फ्रूट व वेलची घालून लाडू वळायचे. शिंगडा पीठामध्ये भरपूर कॅल्शियम व आयर्न आहे.

**२) द्वितीय क्रमांक : अदिती रानडे (मेघ मल्हार संघ)**

वाटपातील मोदक पिठी, नोगा रोज सिरप, केशर यांचा वापर करून, उकडीचे rose मोदक आणि केशर मोदक बनवले. तसेच यादीत आलेली खसखस, खजूर, Ajwa pumpkin seeds, ड्रायफ्रुट्स, डेसिकेटेड कोकोनट यांचा वापर करून खजूर ड्रायफ्रुट रोल बनवले.





**३) तृतीय क्रमांक: सुवर्णा बोडस (कल्पतरू संघ)**

मूग- हरभरा- मेथी वाटली-डाळ

**साहित्य -** मेथी दाणा अर्धी वाटी, नारळ खवलेला एक वाटी, मूग डाळ १ वाटी, हरभरा डाळ १ वाटी, दूध दीड वाटी, हळद १ टीस्पून, हिंग १ टीस्पून, मीठ चवीनुसार, जिरे २ टीस्पून, हिरव्या मिरच्या तीन ते चार, साखर २ टीस्पून, फोडणीचे साहित्य (तेल २ टेबलस्पून, मोहरी, हिंग)


**कृती -** मेथ्यांना एक पेरा एवढे लांब मोड आणावेत. मूग व हरभरा डाळ एकत्र २-३ तास पाण्यात भिजवावी. नंतर निथळून घेऊन मिक्सर वर अगदी थोडी फिरवावी. फार बारीक करू नये, जरा रवाळ ठेवावी. वाटताना त्यात दूध, जिरे, मिरची, कच्चा हिंग निम्मा, हळद, मीठ, साखर घालावे. साधारण इडलीच्या पिठाप्रमाणे मिश्रण असावे.



कुकरच्या भांड्याला आतून तेल लावून घ्यावे. त्यात मिश्रण घालून शिजवून घ्यावे. वरण भाताच्या कुकर बरोबर लावले तरी चालेल. गार करायला ठेवून मग हाताने पूर्ण मोकळे करून घ्यावे.

नंतर फोडणी करावी. त्यात मेथ्या घालून चांगल्या गुलाबी रंगावर तळून घ्याव्यात. त्यात खोबरे घालून ते पण चांगले परतून घ्यावे. मेथी आणि खोबऱ्यासाठी मीठ घालावे. नंतर मोकळी केलेली डाळ घालावी आणि व्यवस्थित हलवून चांगली वाफ आणावी. नंतर त्यावर ओलं खोबरं व कोथिंबीर घालून सजवावे. गणरायाच्या विसर्जनाप्रीत्यर्थ हा झाला अत्यंत पौष्टिक नैवेद्य.

**4) उत्तेजनार्थ : डॉ. ललित मोडक (ब्लू रिज संघ)**



गणपतीच्या प्रसादासाठी पंजिरी

सहसा पंजिरी ही धणे आणि सुंठपासून बनवतात. पण मी Desiccated coconut भाजून त्यात धणेपूड आणि इतर सुकामेवा टाकला आहे आणि सुंठही टाकली. पावसाळी वातावरणात सुंठ आणि धणे प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त म्हणून या पंजिरीचे प्रयोजन.

**साहित्य -** धणे १/२ कप, मकाणे १० ते १२, खवलेला नारळ ७ टेबलस्पून, काजू ५-६, साजूक तूप- ४ टेबलस्पून, बदाम ५-६, खसखस- १/२ टेबलस्पून, सूंठ पावडर- २ टेबलस्पून, अक्रोड- ५-६, चारोळी १५-२०, तुळशीची पाने- ४-५, १५-२० सुर्यफुलाच्या बिया, मनुका ५-६, वेलची पावडर

**कृती -** प्रथम कढईत २ चमचे साजूक तुपात बदाम, काजू, अक्रोड, चारोळी, सुर्यफुलाच्या बिया सोनेरी रंग येईपर्यंत भाजून घ्याव्या. भाजलेले सर्व पदार्थ एका भांड्यात घ्यावेत. त्यात भाजलेली खसखस, खोबरं आणि मनुका घालाव्यात. तसेच उरलेल्या तुपात धणे सुध्दा सुगंध येईपर्यंत भाजून घ्यायचे. भाजलेले धणे वरील सर्व मिश्रणासह मिक्सरमधून काढावेत. नंतर त्या मिश्रणात दळलेली साखर, वेलचीची पावडर, तुळशीची पाने घालावी. सर्व मिश्रण चांगले एकत्र कालवून घ्यावे. सुगंधी आणि पौष्टिक पंजिरी गणपतीसमोर ठेवायला तय्यार!

**5) उत्तेजनार्थ : कविता प्रभुदेसाई (सन प्लॅनेट संघ)**

पंचखाद्य मोदक

**घटक पदार्थ –** १ वाटी सुके खोबरे, पाव वाटी गूळ, ८ - १० खजूर, पाऊण वाटी खारीक पावडर, १ चमचा खसखस, पाव वाटी डिंक, जायफळ, तूप



**कृती** – थोड्या तुपावर डिंक तळून घ्यावा. तुपावर खारीक पावडर हलकी भाजून घ्यावी. अगदी मंद आचेवर सुके खोबरे लाल न करता हलके होईपर्यंत भाजून घ्यावे. कोमट झाल्यावर सर्व साहित्य मिक्सरमधे घ्यावे. बिया असल्यास त्या काढून खजूर घालावा, गूळ पावडर घालावी, जायफळ किसून पावडर घालावी आणि pulse mode वर भरड सारखे फिरवून घ्यावे.

परातीत काढून खसखस घालून मळून घ्यावे. साच्यात घालून मोदक काढावेत. गूळ आणि तूप फार प्रमाणात घालावे लागत नाही. बेताचा गोड असा मोदक चवीला चांगला लागतो.

## शाडू मातीचे गणपती करण्याची कार्यशाळा

**– शिल्पा सोवनी, कार्यवाह, पुणे विभाग**

मुंबई ग्राहक पंचायतीच्या पुणे विभागाने २ ऑगस्ट रोजी पर्यावरण पूरक गणेशोत्सवानिमित्त शाडू मातीपासून गणपती बनवण्याची कार्यशाळा सभासद व कुटुंबियांसाठी अंतर्नाद योग केंद्र येथे आयोजित केली होती. कार्यशाळेत १२ सभासदांनी भाग घेतला त्याकरता मार्गदर्शक म्हणून निरंजन सोवनी यांना बोलावले होते. त्यांना मदतनीस म्हणून बकुळ गोखले व विकास नेहरकर आले होते. सुरुवातीला शिल्पा सोवनी यांनी प्रास्ताविक केले.

निरंजन सोवनी यांनी प्रोजेक्टरच्या सहाय्याने गणपती कसा तयार करायचा आहे याचा प्रथम आराखडा स्पष्ट केला व त्याचबरोबर गणपती करण्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांचे मातीचे नमुने दाखवले नंतर प्रत्येकाला भिजवलेला मातीचा गोळा दिला व सर्वांनी गणपती करायला सुरुवात केली. दुपारी २.३०ला सुरुवात झाली. सर्व सहभागी सदस्यांनी मार्गदर्शनाप्रमाणे सलग ६.३० तास बसून आपापल्या मूर्ती पूर्ण केल्या.



त्यानंतर मूर्ती कशी रंगवायची व कोणते रंग वापरायचे याचे प्रात्यक्षिक दाखविले व मूर्ती विसर्जन घरीच करून तीच माती पुढील वर्षी गणपतीसाठी वापरावी व पर्यावरण जपावे अशी विनंती करण्यात आली.

या कार्यक्रमाला आपल्या विश्वस्त ललिता कुलकर्णी उपस्थित होत्या. मा. नगरसेविका मंजुश्री खर्डेकरही कार्यशाळेला भेट देऊन गेल्या.

# बोरिवलीत इको फ्रेंडली गणेशोत्सव

**– वृषाली आठल्ये, बोरीवली विभाग**

मुंबई ग्राहक पंचायतीच्या बोरिवली विभागाने स्थानिक नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक सण साजरे करण्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. या वर्षी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने इको फ्रेंडली गणेश स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विभागातील एकूण २२ गणेशभक्तांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

स्पर्धेचे तीन मुख्य निकष होते : गणेशमूर्ती व सजावट पर्यावरणपूरक असावी. प्रसाद वाटपासाठी प्लॅस्टिकचा वापर नको. गणेशोत्सव झाल्यानंतर सजावटीची योग्य विल्हेवाट लावली पाहिजे.

ग्राहक पंचायतीच्या प्रतिनिधींनी प्रत्येक सहभागीच्या घरात प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. सर्वच घरगुती गणपती हे पर्यावरणाच्या दृष्टीने आदर्श होते. काही घरांमध्ये धातूच्या मूर्ती होत्या ज्यांचे विसर्जन घरातच करण्यात आले. काही शाडूच्या मूर्तींचे विसर्जनही घरीच करून ती माती पुनर्वापरासाठी मूर्तीकारांना परत करण्यात आली. तसेच, काही कुटुंबांनी सजावट अशा पध्दतीने केली होती की ती पुन्हा वापरता आली. काहींनी सजावटीचे साहित्य इतरांना दान केले, ज्यामुळे त्याचा पुनर्वापर सुनिश्चित झाला.

एक घर विशेषतः लक्षात राहिले, जिथे गेल्या अनेक वर्षांपासून मूर्ती बनवण्याची परंपरा सुरू आहे आणि यंदा ही मूर्ती त्यांच्या



मुलीने स्वतःच्या हाताने बनवली होती. प्रसाद वाटप करताना प्लॅस्टिकच्या पिशव्यांऐवजी सुपारीच्या किंवा पानांच्या द्रोणांचा वापर करण्यात आला. एक विशेष उदाहरण म्हणजे एका कुटुंबाने प्लॅस्टिकच्या रिकाम्या बाटल्या संकलित करून त्या एका गावात कठडे तयार करण्यासाठी दिल्या होत्या. या उपक्रमामुळे प्लॅस्टिक कचऱ्याचा योग्य उपयोग होण्याचा मार्ग मोकळा झाला. या सर्व उपक्रमांमुळे परीक्षकांसाठी सर्वोत्तम गणपती निवडणे हे खूपच कठीण ठरले. प्रत्येक सहभाग अनोखा आणि प्रेरणादायक होता. स्पर्धेच्या निकालापेक्षा सहभागातील जिद्द, नवनवीन कल्पना व पर्यावरणप्रेम अधिक महत्त्वाची ठरली.

राजेंद्र राणे, वृषाली आठल्ये, दिपा कानविंदे, सविता वराडे, सुनेत्रा फडके, रेखा शेटे यांसह कार्यकर्त्यांनी स्पर्धेच्या आयोजनात सहभाग घेतला.

## महत्त्वाची सूचना

मुंबई ग्राहक पंचायतीच्या सभासद नोंदणीचे प्रवेश शुल्क आजवर रू. २/- प्रती सभासद (सहयोगी आणि संघ सभासद), इतके आकारण्यात येत होते. संस्थेच्या कार्यकारिणी सभेने एकमताने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रवेश शुल्क रू. १०/- प्रती सभासद घेण्यात यावे असे ठरविण्यात आले आहे.

सदर निर्णयाची अंमलबजावणी १ नोव्हेंबर २०२५ पासून करण्यात येईल.

कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**– कार्यवाह**

# दिवाळीतील खरेदी

– अंजली पोतदार

दिवाळीची खरेदी म्हटली की पणत्या, कंदील, दिव्यांच्या माळा, रंग रांगोळी, कपडे, साड्या, मिठाई, सुका मेवा या गोष्टींची खरेदी अगदी न चुकता केली जाते. त्याचबरोबर बॅगा, चपला, खरे आणि नकली दागिने, मोबाईल, लॅपटॉप, फ्रिज, स्कुटर, गाड्या, अगदी नवीन घरे सुध्दा खरेदी केली जातात. बाजारपेठा गजबजून जातात. विविध सेल, ऑफर्स यांच्या जाहिराती पेपरमधून, मोबाईलवर, झळकू लागतात. विविध ग्राहक पेठ, व्यापारी पेठ यांचे जागोजागी पेवच फुटते. ग्राहक राजा मग हे घेऊ कि ते घेऊ या विचाराने भांबावून जातो. पण आपल्या कुटुंबाच्या आनंदासाठी दिवाळीत खरेदी ही होतेच.

परवाच एक काकू भेटल्या होत्या. एकदम हौशी. म्हणजे प्रत्येक मोठ्या सणाला काही ना काही हटके खरेदी करणाऱ्या म्हणून सोसायटीत प्रसिध्द. आता वयानुसार जरा कुरबुरी सुरू झालेल्या. मी सहज विचारले, “काय काकू, गणपतीला काय खरेदी केलीत?” काकू उत्साहात म्हणाल्या, “कानातला दागिना केला गं लेकाने मला.” मी मनात म्हटले, आता ८० व्या वर्षी कशाला हवाय यांना कानातलं. तर मनातलं ऐकू आल्यागत म्हणाल्या, “अगं, हिअरिंग एड घेऊन दिलाय संजूने मला. एका कानातलं! छान ऐकू येतंय आता. दिवाळीला सानिया दुसऱ्या कानातलं घेऊन देणारे.” मी एकदम चाट झाले!

कुटुंबासाठी खरेदी करताना थोडासा सामाजिक दृष्टीकोन ठेवून समाजातील वंचित घटकांच्या मदतीसाठी, दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेले मातीचे दिवे, पणत्या, कंदील, खरेदी केले तर त्यांनाही दिवाळीचा आनंद लुटता येतो. (मुंबई ग्राहक पंचायत आपल्या पंचायत पेठांमधून ‘सेतू बांधा रे!’ हा उपक्रम चालवते, हे सभासदांना माहितीच असेल.)

आता कुटुंबासाठी दिवाळी खरेदी करताना काय काय करता येईल ते पाहूया. कपडे तर सगळ्यांसाठी हवेतच. मग प्रत्येकजण किती आणि कोणत्या बजेटपर्यंत कपडे घेणार त्याची यादी करावी. रंग, पोत याची मनात कल्पना ठरवावी. सिल्क साडी, सिल्क कुर्ता घेताना सिल्क मार्कचा आग्रह धरावा. माहितीच्या दुकानातून



किंवा बदलून मिळेल का याची खात्री करून खरेदी करावी. सेलमधून किंवा अनोळखी पेठांमधून केलेल्या खरेदीचा परतावा किंवा बदलावा मिळत नाही हे लक्षात ठेवावे. आपल्या पंचायत पेठांमध्ये मात्र उचित व्यवहार असतो.

घरातील टीव्ही, फ्रिज, मायक्रोवेव्ह इ. उपकरणे घेताना मोबाईलवर, पेपरमध्ये आलेल्या जाहिरातीच्या मदतीने किंमतीची, आकाराची गूगलसर्च करून माहिती मिळवावी. आपल्या जागेत कोणते उपकरण योग्य ठरेल ते ठरवावे. वॉरंटी, सर्विस सेन्टर, ISI मार्क, किती स्टार इ. माहिती नीट करून घेऊन मगच खरेदी करावी सोफा, शोकेस, डाईनिंग टेबल इ. फर्निचर घेताना ते घरात जिथे ठेवणार त्या जागेचे मोजमाप लिहून नेणे अत्यंत आवश्यक आहे. नाहीतर एखादी वस्तू आवडली आणि घेतली, पण नंतर ती आपल्या जागेत बसली नाही तर दुकानदार ती वस्तू परत घेत नाहीत, याचे भान ठेवावे.

वाहन खरेदीसाठीही ते इलेक्ट्रिक आहे की पेट्रोल/डिझेलवर आहे, ऑटोमॅटिक की मॅन्युअल, रजिस्ट्रेशन चार्जेस GST, फ्री सर्विसेस किती आहेत, सर्विस स्टेशन कुठे आहे/ accessories कोणकोणत्या देणार डिलिव्हरी कधी मिळेल, फायनल किंमत किती या सर्व गोष्टी लिखित स्वरूपात घेऊन, टेस्ट ड्राईव्ह घेऊन मगच खरेदी करावी. म्हणजे गाडी वेळेत मिळेल आणि दिवाळीचा आनंद द्विगुणित होईल.

घर खरेदी ही काही घाईने करण्याची गोष्टच नव्हे. त्यामुळे फक्त जाहिरातींना भुलून किंवा स्वस्तात मिळतेय म्हणून कधीही घर खरेदी करू नये. ‘महारेरा’ वर नोंद आहे ना, हे बघून घ्यावे.

रोषणाईच्या दिव्यांच्या माळा, फटाके हे शक्यतो भारतीय बनावटीचेच घ्यावेत. लोकांना त्रास होईल असे फटाके खरेदी करू नयेत. ध्वनी, वायू आणि प्रकाश प्रदूषण कमीत कमी करण्याचा प्रयत्न करावा. सोने, चांदी, हिरे यांची खरेदी करताना पारंपरिक सोनारांकडेच करावी. प्रत्येक दागिन्यांवर हॉलमार्क आहे याची खात्री करावी. पक्के बिल घ्यावे आणि जपून ठेवावे.

दिवाळीचा फराळ शक्यतो घरीच बनवावा. अगदी २ पदार्थ केले तरी चालतील. अगदीच शक्य नसेल तर घरगुती फराळ बनवणाऱ्यांकडून विकत घ्यावा. दुधाचे पदार्थ म्हणजे मावा, खवा, मिठाई वगैरे शक्यतो टाळावे. कारण हे पदार्थ नाशवंत असल्यामुळे लगेच खराब होऊ शकतात. शिवाय भेसळही मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता असते. त्यापेक्षा सुका मेवा आणि फळे घ्यावी.

काय मग मंडळी? करणार ना या छोट्या छोट्या गोष्टीचा विचार दिवाळीची खरेदी करताना?

## नवीन संघास मान्यता

| | | |
|---|---|---|
| **मुंबई** | | |
| विवेकानंद ग्राहक संघ | 12136BD | सभासद 11 |
| राजकमल ग्राहक संघ | 21767BO | सभासद 09 |
| नंदधाम ग्राहक संघ | 21566DH | सभासद 08 |
| अनुराज ग्राहक संघ | 31123BO | सभासद 11 |
| ग्रॅन्डनेस A ग्राहक संघ | 31169DH | सभासद 12 |
| ग्रॅन्डनेस B ग्राहक संघ | 31170DH | सभासद 12 |
| धसवाडी ग्राहक संघ | 12116GR | सभासद 11 |
| रातराणी ग्राहक संघ | 21108AZ | सभासद 09 |
| **ठाणे** | | |
| राहुल ग्राहक संघ | 15689TN | सभासद 16 |
| डी.एस.सी., अंबरनाथ ग्राहक संघ | 15688TN | सभासद 11 |
| मधुमिलिंद ग्राहक संघ | 15689TN | सभासद 10 |
| आठवण, मोहिपाडा ग्राहक संघ | 17825RO | सभासद 09 |
| **रायगड** | | |
| विष्णुनगर ग्राहक संघ | 17714RG | सभासद 09 |

## गणपती कार्यशाळा

रविवार ३ ऑगस्ट या दिवशी मालाड विभागाने अग्रवाल ट्रिनिटी टॉवर येथे शाडूच्या मातीचे गणपती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित केली होती. विनय पाटील सर यांनी कमी वेळेत, सोप्या प्रकारे मुलांना गणपती तयार करायला शिकवले. ATT संघातील मोठ्या सभासदांनीही गणपती तयार करण्याचा आनंद मिळवला. १२ मुलांनी उपक्रमात भाग घेतला. सर्वांना मुंबई ग्राहक पंचायतीच्या उपक्रमांविषयी आणि कार्या विषयीची माहिती अरविंद स्वार आणि तृप्ती करंदीकर यांनी दिली. चित्रा जोशी यांनी आभार मानले.




## श्रद्धांजली



विलेपार्ले विभागातील एक कार्यकर्ती **साधना रायबोले** यांचे २४ ऑगस्टला दीर्घ आजाराने निधन झाले. त्या विभागीय कार्यकारिणी सदस्य होत्या. मुंबई ग्राहक पंचायतीच्या कन्झ्युमर क्लबतर्फे काही वर्षे विभागातील शाळांमध्ये शिकविले. नवोदित ग्राहक संघाच्या संघप्रमुख होत्या.

# कर्जाचे सापळे - फसू नका

– अभय दातार

तुमच्यापैकी अनेकांना पूर्व-मंजूर कर्जे तसेच क्रेडिट कार्डांबद्दल व्हाट्सॲपवर ईमेल, एसएमएस किंवा व्हॉट्स ॲपवर लिंक्स आल्या असतील. आकर्षक पाने लिहिलेले संदेश तुम्हाला सांगतात की फक्त १० मिनिटांत कर्ज मिळवणे कसे सोपे आहे. त्यासाठी तुम्हाला काही ॲप डाउनलोड करावे, तपशील भरावेत, काही अटी आणि शर्ती मान्य कराव्यात इत्यादी गोष्टी सांगितल्या जातात. एकदा तुम्ही ते केले की, तुमच्या नियुक्त खात्यात मंजूर कर्जाची रक्कम जमा होते. आतापर्यंत तर सगळे काही ठीक आहे, परंतु काही महिन्यांतच अडचणी उभ्या राहू लागतात. व्याजदर, हप्ता किंवा ईएमआय रक्कम, काही अतिरिक्त शुल्क आणि इतर गोष्टींवरून वाद होतात. कोणताही वाद उद्भवल्यास संबंधित गोष्टींची पडताळणी करण्यासाठी यापैकी बहुतेक कर्जदारांकडे कर्ज कराराची छापील प्रत, हप्ता किंवा ईएमआय वेळापत्रक, महत्त्वाच्या अटी आणि शर्ती नसतात.

क्रेडिट कार्डसच्या बाबतीत तर अधिक गंभीर गोष्टी घडतात. बहुतेक वेळा ही कार्डे मोठ्या मर्यादेसह मुक्तपणे जारी केली जातात. त्याद्वारे खरेदी केल्यास नंतर जे मासिक बिल येते, ते काही विहित दिवसांनी भरायचे असते; त्यालाच क्रेडिट कालावधी म्हणतात - म्हणजेच, आज तुम्हाला हवे असलेले काहीही खरेदी करा आणि नंतर एका विशिष्ट तारखेला पैसे द्या. खर्चाची एकूण रक्कम मोठी असेल तर ती ईएमआयमध्ये रूपांतरित करण्याचा पर्याय देखील आहे. या सुविधेमुळे ऐशआरामी जीवनशैलीला चटावलेली व्यक्ती सहजपणे सापळ्यात अडकते. एक वेळ अशी येते की ती ईएमआय भरू शकत नाही. नंतर ही व्यक्ती मागील कार्डवरील थकबाकी फेडण्यासाठी दुसरे कार्ड खरेदी करते. नंतर तिसरे कार्ड, चौथे कार्ड इत्यादी. तुमचा कदाचित यावर विश्वास बसणार नाही, परंतु मी अशा घटना पाहिल्या आहेत जिथे अडकलेल्या कर्जदारांकडे आठ ते दहा क्रेडिट कार्ड होती आणि प्रत्येक कार्डावर ३६% ते ४५% दरसाल व्याज आकारले जात होते. जेव्हा एखादी व्यक्ती ऑनलाइन गेमिंग ॲप्समध्ये अडकते आणि झालेला तोटा भरून काढण्यासाठी निकराचा प्रयत्न म्हणून क्रेडिट कार्डद्वारे अधिकाधिक पैसे गुंतवण्याचा प्रयत्न करते तेव्हा देखील हे घडते.

आणखी एक गंभीर प्रकारची मानसिकता म्हणजे गुंतवणूक करण्यासाठी पैसे उधार किंवा कर्जाऊ घेणे. वाचकांना टोरेसची अलीकडची मोठी फसवणूक आठवत असेल. अनेकांनी वेगवेगळ्या आमिषांना बळी पडून तसेच संभाव्य परिणामांचा विचार न करता कर्ज घेऊन गुंतवणूक केली; कशासाठी, तर कमी वेळात जास्त परतावा मिळवण्यासाठी.




विविध प्रकारच्या कर्जामध्ये मोठ्या प्रमाणात अडकलेला एकजण मला अलीकडेच भेटला. जेमतेम बत्तिशीचा एक तरुण. चांगला पगार मिळवत होता. परंतु आयुष्यात व्यवस्थित स्थिरावण्यापूर्वी त्याने एक मोठा फ्लॅट आणि एक नवीन कार खरेदी केली. घर सजवण्यासाठी खूप खर्च केला. दुर्दैवाने करोना काळात नोकरी गेल्याने त्याची सर्व स्वप्ने धुळीला मिळाली. खरे तर इतक्या लवकर या खरेदीची आवश्यकता होती का? तो वाहतुकीचा पर्यायी मार्ग वापरू शकला असता, भाड्याने घेतलेल्या एका लहान पण आरामदायी घरात राहू शकला असता. पण 'प्रतिष्ठा', 'मानसन्मान' हे अधिक महत्त्वाचे प्राधान्यक्रम ठरवले गेले. इतरांकडे आहे, मग माझ्याकडे का नको, ही ती मानसिकता. त्याला कार विकावी लागली, पण फ्लॅट विकणे कठीण होत होते. या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी त्याच्याकडे इतर कोणतीही मालमत्ता नव्हती.

हे केवळ मोठ्या शहरांमध्येच नाही तर लहान शहरांमध्येही घडत आहे. काही लोभ किंवा काही भीती. बरेच जण सारासार विचार न करता या सापळ्यात अडकत आहेत. काही जण भीतीमुळे कुटुंबातील सदस्यांना किंवा जवळच्या मित्रांनाही त्यांची चिंता सांगत नाहीत. अनेकांचा क्रेडिट स्कोअर लहान वयातच खराब झाला आहे, म्हणून बरेच जण क्रेडिट कार्डकडे वळत आहेत. पण हे म्हणजे केवळ आगीतून फुफाट्यात पडण्यासारखे आहे. क्रेडिट कार्डाबरोबर देऊ करण्यात येणारी आणखी एक ऐच्छिक सुविधा म्हणजे 'ॲड ऑन कार्ड.' हे कार्ड मूळ कार्डधारकाच्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीला देता येते. याची खर्चाची मर्यादा साधारणपणे

मूळ कार्डाइतकीच असते. पण या कार्डाचे बिल मूळ कार्डधारकालाच भरावे लागते. त्यामुळे या अतिरिक्त कार्डाचा वापर जपून करायला हवा, अन्यथा मूळ कार्डधारक अडचणीत येऊ शकतो. असे लोक देखील आहेत ज्यांनी गरज नसतानाही केवळ कर्ज सहज उपलब्ध होत आहे म्हणून, फक्त पूर्व-मंजूर कर्जासाठी संदेश मिळाल्याने कर्ज घेतले. अशा प्रकारची कर्जे बहुधा फसव्या अॅपद्वारे दिली जातात. या ठिकाणी कर्जदाराच्या क्रेडिट स्कोअरची फारशी पर्वा नसते आणि कर्ज देणाऱ्यांना रस असतो तो भरमसाठ व्याज मिळविण्यात.

वाचकांना माहिती असेलच की मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी आपल्या मुंबई ग्राहक पंचायतीचे ग्राहक मार्गदर्शन कक्ष आहेत. पीडित कर्जदार सल्ला घेण्यासाठी येतात. परंतु वर सांगितल्याप्रमाणे, बहुतेक कर्जदारांकडे कोणतीही मालमत्ता शिल्लक नसल्याने योग्य सल्ला देणे खूप कठीण होते.

अर्थात, सगळं काही संपलं असा त्याचा अर्थ नव्हे. काहीतरी आशा असते. नीट विश्वासात घेऊन विचारले की काहीजण मन मोकळं करतात; सांगतात की त्यांच्याकडे जीवन विमा पॉलिसी, दागिने इत्यादी आहेत. अशा परिस्थितीत, जास्त व्याजदर असलेली कर्जे कमी कशी होतील ते पाहणे आवश्यक आहे. जीवन विमा कंपन्या त्यांच्या पॉलिसींवर कर्ज देतात. तुलनेने व्याजदर कमी आहेत आणि परतफेडीच्या सुविधा देखील सोयीस्कर आहेत. हे कर्ज घेऊन त्याद्वारे क्रेडिट कार्डावरील थकबाकी फेडणे अधिक योग्य होईल. तसेच, भरमसाठ व्याज आकारल्या जाणाऱ्या कर्जाची परतफेड करण्यासाठी दागिन्यांवर कर्ज घेऊन त्याचे व्याज आणि हप्ते भरत बसण्यापेक्षा दागिने विकणे हा अधिक चांगला पर्याय आहे. भविष्यात आर्थिक परिस्थिती सुधारल्यावर नवीन दागिने करता येतील.

इतका भयानक धडा शिकल्यानंतर, पूर्णपणे शाश्वत जीवनशैली जगणे, लोभ आणि भीती टाळणे, कोणत्याही आमिषाला बळी पडण्यापूर्वी दहा वेळा विचार करणे महत्त्वाचे आहे. काही बँका कर्जाची परतफेड करू न शकणाऱ्यांसाठी समुपदेशनाची सेवा देतात, काही मार्ग निघतोय का ते बघतात. तुमची बँकही अशी सेवा देते का ते तपासा आणि असल्यास तिचा लाभ अवश्य घ्या.

वाचकहो, मुदत ठेवींचा जास्तीत जास्त वापर कसा करून घ्यायचा याची माहिती देणारा आमचा मागच्या अंकातील लेख तुम्हाला आवडला का?

- तुम्हाला कोणती सुविधा सगळ्यात जास्त पसंत पडली?
- तुम्ही तुमच्या ठेवी बचत खात्याशी जोडल्या आहेत का?
- मुदतीपूर्वी मोडता येणाऱ्या मुदत ठेवी आणि मुदतीपूर्वी मोडता न येणाऱ्या मुदत ठेवी यांच्यातील फरक तुम्हाला कळला का?

## 'Be a Safe Rider'

**– मंगला गाडगीळ**




अंधेरी-जोगेश्वरी विभागातर्फे विद्या विकास शाळेत २० फेब्रुवारी रोजी आगळा वेगळा कार्यक्रम घेण्यात आला. दुसरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी 'Be a safe rider' हा कार्यक्रम घेण्यात आला. लिफ्ट, एस्कलेटर आणि मुव्हींग वॉक (एअरपोर्ट) वापरताना काय काळजी घ्यावी हे सांगण्यात आले. हा कार्यक्रम Elevator and Escalator Safety Trust तर्फे सादर करण्यात आला. सादरीकरणासाठी राजेंद्र जोशी आणि मार्जिना चिटणीस आल्या होत्या

# मुंबई ग्राहक पंचायत

(सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक : एफ - ७००० मुंबई) सोसायटी रजि नं. BOM 417/81GBBSD
ग्राहक भवन, संत ज्ञानेश्वर मार्ग, जे.व्ही.पी.डी. मार्केट, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६.
दूरध्वनी : (०२२) ४७५० ८५४१ / ४७५० ८५४२
Email : mpanchayat@gmail.com • Website : https//www.mymgp.org

## ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**(२०२४-२५)**
**सूचना**

मुंबई ग्राहक पंचायतीच्या सभासदांची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळ फोंडके यांच्या अध्यक्षतेखाली रविवार, दि. २६ ऑक्टोबर २०२५ रोजी, दुपारी ३.०० वा. सरस्वती विद्यामंदिर सभागृह, डी. एन. नगर, अंधेरी (प), मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**– सभेपुढील कामकाज –**

१. सभेची सूचना वाचणे.

२. रविवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजुरी घेणे.

३. मुंबई ग्राहक पंचायतीचा १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीचा कार्य अहवाल सादर करून त्यास मान्यता घेणे.

४. सन २०२४-२५ या वर्षाच्या लेखापरीक्षीत हिशेबाची पत्रके, ताळेबंद, हिशेब तपासणीचा अहवाल सादर करणे व मंजूर करणे.

५. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या काळाकरिता वैधानिक हिशोब तपासनिसाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

६. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी कार्यकारी मंडळाने सादर केलेले अंदाजपत्रक मंजूर करणे.

७. संस्थेच्या घटनेतील प्रस्तावित दुरुस्तीवर चर्चा आणि निर्णय. (सोबत घटनादुरुस्ती प्रस्ताव जोडला आहे.)

८. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.

दिनांक : १ ऑक्टोबर २०२५

अनिता खानोलकर
कार्यवाह

**– सूचना –**

१) नियत गणसंख्येच्या (मतदानाचा हक्क असणारे ५० सदस्य) अभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी त्याच स्थळी दुपारी ठीक ३.३० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२) वार्षिक अहवाल आणि हिशेबाबाबत कोणतेही प्रश्न असल्यास संबंधितांनी सभेच्या किमान पाच दिवस आधी कार्यवाहांना ग्राहक भवनच्या पत्त्यावर लेखी कळवावे.

३) संस्थेचा ४४वा वार्षिक अहवाल मुंबई ग्राहक पंचायतीचे ग्राहक भवन, पार्ले गोडाऊन, ठाणे वितरण केंद्र, पालघर वितरण केंद्र, रायगड वितरण केंद्र (पेण), वसई वितरण केंद्र व पुणे वितरण केंद्र येथे आणि ऑनलाईन सभासदांच्या अवलोकनार्थ दि. ८ ऑक्टोबर २०२५ पासून उपलब्ध असेल.

# Proposed Amendments to MGP Memorandum of Association & Bye-laws

To add in Memorandum of Association following clause :

D. xv: To enroll as Institutional members, any institutions/organizations operating for the benefit of senior citizens, tribals, destitutes, school students, patients, women's welfare or any self- help groups or any self-employed persons engaged in providing meals to people.

To add in the Rules & Regulations following clauses:

Membership of the Panchayat:

Clause 2) (i) The MGP shall have the following categories of membership namely:

a. Grahak Sangh members
b. Associate Members
c. Honarary Members
d. Institutional Members (new addition)

d) The Managing Committee may admit as an Institutional Member any institution, organization operating for the benefit of senior citizens, tribals, destitutes, school students, women's welfare or as a social charity or any self-help groups, co- operative societies or any self-employed persons engaged in providing meals to people and agrees to pay in advance an admission fee and annual fees as may be determined by the Managing Committee from time to time, including the quantum thereof and participate in any of the activities of the MGP.

3) Cessation of Membership:

i) .........

ii) insert "or Institutional Member" after an Associate Member

iii) An Institutional Member shall cease to be a Member of MGP if he/it is found to misuse in any way the products obtained through MGP's distribution channel by way of re-sale or by any other means.

4) General Body:

The General Body of MGP shall comprise of:

i) .........

ii) .........

iii) .........

iv) .........

v) .........

vi) Institutional Members (new sub-clause to be added)

(टीप - घटनेतील ज्या तरतुदींमध्ये बदल अपेक्षित नाही तेथे रिकाम्या जागा सोडलेल्या दिसत आहेत.)

## Dark Patterns and Consumer Protection

– **Uday Pingale, Economics Enthusiast**

When you make transactions online, have you ever faced an unexpected shock? Suddenly you get options you didn't ask for, your bill turns out higher than expected, or a random window pops up and you unknowingly start interacting with it. Today, almost everyone uses the internet. People expect that the platform they're using will be simple, clear and easy to understand. Normally, a good platform is designed to give quick information and be user-friendly.

But now, that's not always the case. Big companies like Google, Meta, Amazon, and LinkedIn use clever tricks to draw users towards their desired actions. Internet experts study how users respond to what they see, then design the site in such a way that the user's choices are influenced without them realising it. This intentional design — made to guide you into doing what the company wants — is called a dark pattern. It's a design technique that can mislead you and affect your decision-making.Examples:

- While setting up an account, your contacts are collected with subtle permissions. Soon you and your contacts start getting unrelated emails. Important mails get buried under spam.
- A credit card with attractive offers is given to you, but later a hidden fee is automatically deducted from your bank account — which you notice much later.
- While browsing, a pop-up window forces you to sign in and cannot be closed.
- When buying multiple items, an extra low-value item you never ordered is added automatically. Returning it for a refund is often more trouble than it's worth.
- The displayed price of a product looks low, but taxes and handling charges are added later, making the bill much higher.
- Prices are set in such a way that you are forced to buy multiple items together.
- Misleading messages are sent to push you into buying.
- You keep getting endless notifications.You are constantly shown irrelevant advertisements.
- While booking travel tickets, insurance is pre-selected by default. If you don't notice and uncheck it, you pay for something you never wanted.

Such practices keep customers off-guard and increase business profits in an unfair way. To prevent this kind of digital deception, India's advertisers self-regulation body, ASCI, had earlier issued guidelines explaining what counts as a dark pattern. But since these practices continued, the Central Consumer Protection Authority (CCPA) has now officially identified 13 types of dark patterns. All e-commerce platforms have been advised to keep their sites free from them.

As consumers, we must remain alert so we don't get caught in the black web of dark patterns.

## Digital Frauds – a huge Challenge

With increasing cyber frauds a very pertinent question is being asked, 'Are banks' system robust enough to protect their depositors from digital arrest?' Three defrauded victims of digital arrest have chosen to move NCDRC and the total amount lost by them is Rs.22.03 crores. Adv. Mahendra Limaye is representing all three. Of these three two are from Gurugram and one from Mumbai. It's interesting to note that the fraudsters routed money from the Gurugram lady's account through 141 bank accounts across country in three

# सहज, सोप्या पध्दतीचा आकाशकंदील

– विनय पाटील



**साहित्य** – रंगीत पेपर, टाकाऊ प्लॅस्टीक डब्बा, लेस, सजावटीसाठी काही साहित्य, कात्री, गम इत्यादी.

**कृती** – १. रिकामा प्लॅस्टिकचा डब्बा घेऊन त्यावर कागद गोल गुंडाळा.




२. आकृतीत दाखवल्याप्रमाणे तीन रंगाचे वेगवेगळे कागद घेऊन त्याचे छोटे सारख्या मापाचे चौरस तयार करून घ्या.

३. प्रत्येक चौरसाला आकृतीत दाखविल्याप्रमाणे चार बाजूने घड्या घाला व डब्ब्यावर गमच्या सहाय्याने चिटकवा.

४. लेसचा वापर करून तीन गोंडे तयार करून लावा.

५. सजावटीसाठी आपण इतर वस्तूंचा वापर करू शकता.









## पणती सजावट

**साहित्य** – टाकाऊ रिकामी बाटली, रंग, पणती, एमसील(चिटकवण्यासाठी) सजावटीसाठी मणी इत्यादी.

**कृती** – प्रथम बाटली स्वच्छ धुवून त्यावर एमसीलच्या सहाय्याने पणत्या चिटकवून घेतल्या. त्यांना रंगवले. सजावटीसाठी एमसीलने मणी चिटकवले.

अशा प्रकारे घरी असलेल्या टाकाऊ वस्तूंचा वापर करून आपण छान पणती सजावट करू शकतो.

layers of transaction. The transfers were effected within seconds of each transaction. These fraudulent transactions were done using a single fictitious account. This naturally puts safety measures of respective banks under scanner. The notices which highlight breach of RBI norms were sent by NCDRC to Kotak Mahindra Bank, ICICI Bank, UCO, Federal Bank, Yes Bank, State Bank of India, HDFC and few others. According to an order dated March 3 and a subsequent order on July 7, the Commission admitted petitions filed by several digital arrest victims.

(Ref. News - Money Control)

• POSTAL REGISTRATION NO. MCN/158/2023-2025 • WPP LICENSE NO. MR/TECH/WPP-137/NORTH/2023-2025
• LICENSE TO POST WITHOUT PREPAYMENT, ON 5TH & 6TH • VILE PARLE (W) P.O. MUMBAI - 400 056
RNI NO. MAHBIL/2011/39044

# आनंदोत्सव पंचायत पेठेचा

– अनघा आचरेकर, पंचायत पेठ सदस्य






२०२५ च्या पंचायत पेठांच्या तिसऱ्या टप्प्यातील पहिली ग्राहक पंचायत पेठ दादर येथील सुर्यवंशी क्षत्रिय समाज सभागृह येथे दिनांक ९ ते १६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत संपन्न झाली. पेठेचे उद्घाटन अमर हिंद मंडळाच्या कार्यवाह सीमा कोल्हटकर यांच्या हस्ते करण्यात आले. पेठेत एकूण ७८ स्टॉल्स होते त्यातील ११ स्टॉल्स पहिल्यांदाच सहभागी झाले होते. दादर विभागाच्या कार्यवाह रंजना मंत्री तसेच प्रिया कुलकर्णी, कविता कत्रे, मेधा पेंढारकर, सुनंदा भोगले, स्वप्ना पंडित या कार्यकर्त्यांनी बऱ्याच ठिकाणी पोस्टर्स लावून प्रचार केला, विशेष म्हणजे चेंबूरच्या जान्हवी नाडकर्णी आणि विनिता बेडेकर या दोघींनी काही स्टॉलधारकांचे आणि ग्राहकांचे बाईट्स घेऊन आपल्या इंस्टाग्रामवर upload केले त्याबद्दल त्यांचे कौतुक आणि आभार. तसेच यूट्यूबचा छान वापर करून पेठेची जाहिरात केली गेली. यावेळेस पेठेची एकूण उलाढाल रुपये २,३६,४१,६५३/- झाली. पावसाचे सावट असूनही चोखंदळ ग्राहकांनी जोरदार खरेदी केली आणि पुन्हा एकदा ऑफलाईन खरेदीला ग्राहकांनी प्राधान्य दिले.

## आगामी खरेदी उत्सव

ग्राहक पंचायत पेठेतील चौथा आणि अंतिम टप्पा दिवाळीनंतर सुरू होईल. ह्या टप्प्यात चेंबूर, पेण, पुणे, बोईसर आणि अलिबाग येथे पंचायत पेठेचे आयोजन करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ३० सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर २०२५ | गणपतराव वर्तक हॉल, न्यू इंग्लिश स्कूलसमोर, वसई (प) | ७ दिवस |
| २. | ७ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर २०२५ | भाटियावाडी हॉल, बाभई, बोरीवली (प) | ८ दिवस |